**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
दालन क्र.एम-७ ए, पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक :०२२-२२०२३४४५ e-mail: deskm123.rfd-mh@gov.in

**क्र. मुद्रांक-२०२२/प्र.क्र.५८०/म-१(धोरण)** **दिनांक:- १३ मार्च, २०२५**

प्रति,

१. मा.राज्यमंत्री (वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय,कामगार) मंत्रालय, मुंबई.
२. मा. श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स., एस. टी. बस स्टँड जवळ, मुक्तेश्वर रोड, औसा, जि. लातूर-४१३ ५२०.
३. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य,पुणे.
४. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. उप सचिव (ज-१अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय:-** शेत जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणीमध्ये शेत रस्त्याच्या समावेश बंधनकारक करणे व शेत रस्त्याच्या नोंदी सातबाराच्या इतर हक्कात करणेबाबत...

**संदर्भ:-** शासनपत्र सम क्र.दि.१५.०१.२०२५.

महोदय ,

उपरोक्त विषयी मा. मंत्री (महसूल) महोदयांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक १६.१.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत-वरीलप्रमाणे

**आपला,**

१३।३।२०२५

**(सुनिल जाधव)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. अ.मु.स. (महसूल), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. उप सचिव (म-१ धो), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. नस्ती, कार्यासन म-१ (धोरण), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय:- शेत जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणीमध्ये शेत रस्त्याच्या समावेश बंधनकारक करणे व शेत रस्त्याच्या नोंदी सातबाराच्या इतर हक्कात करणेबाबत....**

विषयाधीन प्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली गुरूवार, दि. १६ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. बैठक पार पाडली. सदर बैठकीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी/प्रतिनिधींचे नाव | पदनाम व विभाग |
|---|---|---|
| १. | ॲड. आशिष जयस्वाल | मा.राज्यमंत्री (वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय,कामगार) मंत्रालय, मुंबई. |
| २. | श्री. अभिमन्यु पवार | मा.विधानसभा सदस्य |
| ३. | श्री. राजेश कुमार | मा.अप्पर मुख्य सचिव,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ४. | श्री. एकनाथ डवले | मा.प्रधान सचिव, ग्रामविकास आणि पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ५. | श्री. सत्यनारायण बजाज | उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ६. | श्री. उदयराज चव्हाण | नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय),नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे. (ऑनलाईन) |
| ७. | श्री. संतोष हिंगाणे | सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, पुणे शहर, पुणे. |
| ८. | श्री. सुनिल जाधव | कार्यासन अधिकारी म,(धो) १- महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ९. | श्री. शुभम बोबडे | कक्ष अधिकारी ज-१ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. |

२. उपरोक्त विषयी सदर बैठकीत सांगोपांग चर्चा करण्यात आली.

सदर चर्चेदरम्यान श्री.अभिमन्यु पवार, मा. विधानसभा सदस्य यांनी सर्व शेत रस्त्यांच्या सात बारा उताऱ्यावर इतर हक्कांत नोंदी घेण्यात याव्यात, शेत रस्त्यांवरील अतिक्रमणांबाबत विधि व न्याय विभाग, संबंधित तहसिलदार व कृषि विभागाकडून माहिती घेण्यात यावी, महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ मध्ये दुरुस्ती करण्यात यावी तसेच शेतामध्ये जाण्या- येण्यासाठी व शेतमाल वाहतुकीसाठी रस्ता असल्याशिवाय दस्त नोंदणी करु नये अशी विनंती केली.

तर ॲड. आशिष जयस्वाल, मा.राज्यमंत्री यांनी अस्तित्वातील शेत रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात यावेत, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (Maharashtra Remote Sensing Application Centre-MRSAC) या संस्थेने शेत रस्त्यांचा सर्व्हे केला असून शिवरस्ते व पाणंद रस्त्यांना क्रमांक देण्यात यावेत, महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ मधील तरतुदीनुसार दिलेले कच्चे रस्ते पक्के बनवण्याचा शासनास अधिकार नाही, त्यामुळे खाजगी जमीनीत बांधकाम करता येत नाही, त्यासाठी रस्त्याच्या जमिनीसाठी भुसंपादन कायद्यानुसार भुसंपादन करून संबंधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात यावा अशी सूचना केली.

वरील चर्चेच्या अनुषंगाने मा. अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | कार्यवाहीचा मुद्दा | संबंधित विभाग | कालमर्यादा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | गाव नकाशावर असलेल्या शिवरस्ते व पाणंद रस्त्यांना क्रमांक देण्यात यावेत व त्याची यादी जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीना देण्यात | महसूल विभाग , आयुक्त जमाबंदी | २ महिने | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | यावी. | | | |
| २. | महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ नुसार शेतामध्ये जाण्या-येण्यासाठी रस्ता देताना यांत्रिकीकरणाचा विचार करून ट्रॅक्टर जाईल इतक्या रुंदीचा रस्ता देण्यात यावा. | महसूल विभाग | ३ महिने | |
| ३. | महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ नुसार दिलेले रस्ते तसेच गाव नकाशावर नोंद असलेले रस्ते हे वाहिवाटीचे रस्ते असून त्याच्या नोंदी महाराष्ट्र महसूल संहिता मधील निस्तार पत्रक व वाजिब उल हर्ज च्या तरतुदी नुसार करण्यात याव्यात. यामुळे भविष्यात रस्त्याकरीता भूसंपादनाचे प्रश्न उपस्थित होणार नाही | महसूल विभाग | ३ महिने | |
| ४. | शिवरस्ते व पाणंद रस्त्यांच्या विवादाबाबत महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ मधील (सीमांवरून रस्त्याचा अधिकार) तरतुदीनुसार दिलेल्या शेत रस्त्याच्या वाद प्रकरणात राज्य शासनाचे पुनर्विलोकनाचे अधिकार प्रत्यार्पित करून विभागीय आयुक्त यांना सुनावणीचे अधिकार देण्यात यावेत. | महसूल विभाग | ३ महिने | |
| ५. | मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ मध्ये अपीलानंतर पुनर्विलोकनाची तरतूद करून अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सुनावणीचे अधिकार देण्यात यावेत. त्यानुसार कायद्यात सुधारणा करण्यात यावी. | महसूल विभाग | ३ महिने | |
| ६. | महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ नुसार शेतजमिनीचे वाटप करताना मोजणी अनिवार्य करून वाटपाच्या दस्तास मुद्रांक शुल्क रु. ५००/- व वाटपाच्या दस्ताची नोंदणी करणे अनिवार्य करण्याबाबत कार्यवाही करून नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांचेकडून परिपत्रक निर्गमित करण्यात यावे. | महसूल विभाग / मुद्रांक व नोंदणी विभाग. | ३ महिने | |

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.